# भीम स्तुति

दिव्य प्रभरत्न तू साधू वरदान तू
आद्य कुल भूषण तू भीमराजा ||१||
सकल विद्यापति, ज्ञान सत्संगति,
शास्त्र शासनमति, बुद्धी तेजा ||२||
पंकजा नरवरा, रत स्वजन उद्धरा,
भगवंत आमुचा खरा, भक्तकाजा ||३||
चवदार संगरी शस्त्र न धरिता करी,
कांपला अरी उरी, रोद्र रूपा ||४||
मुक्ती पथ कोणता जीर्ण स्मृती जाळीता,
उजाळीला अगतिका, मार्ग साचा ||५||
राष्ट्र घटनाकृती, शोभते भारती,
महामानव बोलती, सार्थ संज्ञा ||६||
शरण बुद्धास मी |शरण धम्मास मी |
शरण संघास मी भीमराजा ||७||

eAstroHelp